Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१५/२०२४

**विषय - Digital Infrastructure ची माहिती भरणेबाबत**

**संदर्भ - परिपत्रक शिवाजी वि./संगणक केंद्र/ ०००४२ दि.१० नोव्हेंबर, २०२३**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवकांना कळविण्यात येते की, संगणक केंद्राने उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार आपल्या अधिविभाग /प्रशासकीय विभागातील **Digital Infrastructure** ची माहिती खाली उपलब्ध करुन दिलेल्या लिंक मध्ये नोंद /अद्यावत करणेबाबत कळविणेत आलेले होते. परंतु अद्यापी काही अधिविभाग/प्रशासकीय विभागांनी सदरची माहितीची नोंद/ माहिती अद्यावत केलेली नाही असे दिसून येत आहे. माहिती तंत्रज्ञान मंडळाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व अधिविभाग /प्रशासकीय विभागांनी **Digital Infrastructure** ची माहिती दिलेल्या टॅब मध्ये अद्यावत करणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यानुसार सर्वांनी तात्काळ कार्यवाही करावी. व सर्व अधिविभाग /प्रशासकीय विभागांनी **Digital Infrastructure** ची अद्यावत केलेल्या माहितीची प्रत विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन संगणक केंद्र यांना देण्यात यावी.

तसेच, संगणक केंद्राने गठित केलेली समिती अधिविभाग /प्रशासकीय विभागानां भेटी देवून Digital Infrastructure अद्यावत केलेली माहिती तपासणार आहे.

संबधित अधिविभाग/प्रशासकीय विभागांनी Digital Infrastructure ची माहिती अद्यावत केल्याशिवाय त्या अधिविभागास/प्रशासकीय विभागास नविन उपकरण खरेदी करता येणार नाही किंवा कोणतेही उपकरण संगणक केंद्राकडून दुरुस्त करुन घेता येणार नाही. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सदरची माहिती खाली दिलेल्या लिंकद्वारे भरण्यात यावी.

अधिविभागांकरीता https://sukapps.unishivaji.ac.in/suk_dept_app/#/login:
प्रशासकीय विभागांकरीता : https://sukapps.unishivaji.ac.in/section-pro/#/login

( डॉ. व्ही. एन. शिंदे )
कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/** 588
दि. 06 APR 2024

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, संचालक, यांचे कार्यालयास.
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक
३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

Estd 1962
"A++"Accredited by NAAC (2021)
With CGPA3.52

# परिपत्रक

विद्यापीठातील सर्व अधिविभागांकरीता संगणक केंद्राकडून Admission Module मध्ये Digital Infrastructure नोंद करण्यासाठी टॅब देण्यात आला आहे. सदर टॅबमध्ये Computer, Laptop, Workstation, Printer, Projector, Smart board व Interactive Panel बाबतची सविस्तर माहिती तसेच उपकरणांची Depreciation cost व Purchase Order अपलोड करण्याची सुविधा देण्यात आली आहे. या माहितीची नोंद केल्यानंतर Computer, Laptop, Workstation, Printer, Projector, Smart board व Interactive Panel चालू स्थितीमध्ये आहेत की बंद स्थितीमध्ये आहेत अथवा निर्लेखित केले असतील तर याची माहिती प्राप्त होणार आहे. सदरची माहिती IT ticket या प्रणालीशी जोडण्यात येणार असल्याने या उपकरणांची History व त्यांचा Verification Report मिळण्यास सोईचे होईल. तसेच Digital Infrastructure ची अद्यावत माहिती IQAC विभागाला सातत्याने नोंद करण्याकरिता आवश्यक असल्याने Digital Infrastructure ची माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे.

सबब, सर्व अधिविभागांना आदेशानुसार कळविण्यात येते की, Digital Infrastructure ची माहिती उपलब्ध करून दिलेल्या टॅबमध्ये लवकरात लवकर भरण्यात यावी. संबंधित अधिविभागांनी माहिती अद्यावत न केल्यास त्या अधिविभागाचे कोणतेही उपकरण दुरूस्त करून दिले जाणार नाही. तसेच संबंधितांना नविन उपकरण खरेदी करण्यासाठी अभिप्राय दिला जाणार नाही. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कुलसचिव

शिवाजी वि/संगणक केंद्र/ 00042
दि. 10 NOV 2023